# युगे अठ्ठावीस

युगे अठ्ठावीस विटेवरी उभा।। वामांगीं रखुमाई दिसे दिव्य शोभा।। पुंडलिकाचे भेटी परब्रह्म आलें गा।। चरणीं वाहे भीमा उद्धरीं जगा ।।१।। जय देव जय देव जय पांडुरंगा।। रखुमाईवल्लभा राईच्या वल्लभा पावें जिवलगा ।।जय०।।धृ०।। तुळसीमाळा गळां कर ठेवुनि कटीं।। कासें पितांबर कस्तुरि लल्लाटीं।। देव सुरवर नित्य येती भेटी।। गरुड हनुमंत पुढे उभे राहती।। जय०।।२।। धन्य वेणूनाद अनुक्षेत्रपाळा ।। सुवर्णाची कमळें वनमाळा गळां।। राही रखुमाबाई राणीया सकळा।। ओंवाळीती राजा विठोबा सांवळा ।।जय०।।३।। ओंवाळूं आरत्या कुरवंड्या येती।। चंद्रभागेमाजी सोडुनियां देती।। दिंड्या पताका वैष्णव नाचती।। पंढरीचा महिमा वर्णावा किती ।। जय०।।४।। आषाढी कार्तिकी भक्तजन येती।। चंद्रभागेमाजीं स्नानें जे करिती ।। दर्शन हेळामात्रें तयां होय मुक्ती ।। केशवासी नामदेव भावें ओंवाळिती ।।५।।

# येई हो विठ्ठले

येई हो विठ्ठले माझे माउली ये ।। निढळावरी कर ठेवुनि वाट मी पाहें ।।धृ०।। आलिया गेलिया हातीं धाडीं निरोप ।। पंढरपुरी आहे माझा मायबाप ।। येई०।।१।। पिवळा पितांबर कैसा गगनीं झळकला।। गरुडावरी बैसूनि माझा कैवारी आला।। येई०।।२।। विठोबाचे राज्य आम्हां नित्य दीपवाळी।। विष्णुदास नामा जीवें भावे ओवाळी।। येई०।।३।।

# श्रीदुर्गादेवीची आरती

दुर्गे दुर्घट भारी तुजविण संसारी ।। अनाथनाथे अंबे करुणा विस्तारी ।। वारीं वारीं जन्ममरणातें वारीं ।। हारी पडलों आतां संकट नीवारीं ।।१ ।। जय देवी जय देवी महिषासुरमथिनी ।। सुरवरईश्वरवरदे तारक संजीवनी ।। जय० ।।धृ०।। त्रिभुवनभुवनी पाहातां तुजऐसी नाहीं। चारी श्रमले परंतु न बोलवे कांही ।। साही विवाद करितां पडले प्रवाहीं ।। ते तूं भक्तांलागीं पावसि लवलाही ।। जय ०।।२।। प्रसन्नवदने प्रसन्न होसी निजदासा।। क्लेशापासुनि सोडीं तोडीं भवपाशा।। अंबे तुजवांचून कोण पुरविल आशा।। नरहरि तल्लिन झाला पदपंकज लेशा ।। जय०।।३।।

# लवथवती विक्राळा

लवथवती विक्राळा ब्रह्मांडी माळा।। विषें कंठ काळा त्रिनेत्रीं ज्वाळा ।। लावण्यसुंदर मस्तकी बाळा ।। तेथुनियां जळ निर्मळ वाहे झुळझुळां ।। १।। जय देव जय देव श्रीशंकरा ।। आरती ओवाळूं तुज कर्पुरगौरा ।।धृ०।। कर्पुरगौरा भोळा नयनीं विशाळा ।। अर्धांगी पार्वती सुमनांच्या माळा ।। विभूतीचें उधळण शितिकंठ नीळा ।। ऐसा शंकर शोभे उमावेल्हाळा ।। जय० ।।२।। देवीं दैत्यीं सागरमंथन पैं केले ।। त्यामाजी अवचित हाळाहळ उठिलें । तें त्वां असुरपणें प्राशन केलें।। नीलकंठ नाम प्रसिद्ध झालें।। जय० ।। ३।। व्याघ्रांबर फणिवरधर सुंदर मदनारी ।। पंचानन मनमोहन मुनिजनसुखकारी ।। शतकोटींचें बीज वाचे उच्चारी ।। रघुकुळटिळक रामदासा अंतरी ।। जय० ।।४।।

# शेंदुर लाल चढायो

शेंदुर लाल चढायो अच्छा गजमुखको ।। दोंदिल लाल बिराजे सुत गौरीहरको ।। हाथ लिये गुडलड्डू सांई सुरवरको ।। महिमा कहे न जाय लागत हूं पदको ।।१।। जय जय जी गणराज विद्यासुखदाता ।। धन्य तुम्हारो दर्शन मेरा मन रमता ।।धृ०।। अष्टौ सिद्धी दासी संकटको बैरी ।। विघ्नबिनाशन मंगल-मूरत अधिकारी ।। कोटीसूरजप्रकाश ऐसी छबि तेरी ।। गंडस्थलमदमस्तक झूले शशिबिहारी ।। जय० ।।२।। भावभगतसे कोई शरणागत आवे ।। संतत संपत सबही भरपूर पावे ।। ऐसे तुम महाराज मोको अति भावे ।। गोसावीनंदन निशिदिन गुण गावे ।। जय०।। ।।३।।

# सुखकर्ता दुःखहर्ता

सुखकर्ता दुःखहर्ता वार्ता विघ्नाची ।। नुरवी पुरवी प्रेम कृपा जयाची ।। सर्वांगी सुंदर उटि शेंदुराची ।। कंठी झळके माळ मुक्ताफळांची ।। १ ।। जय देव जय देव जय मंगलमूर्ती ।। दर्शनमात्रें मन: कामना पुरती ।। धृ.।। रत्नखचित फरा तुज गौरीकुमरा। चंदनाची उटी कुंकुम केशरा ।। हिरेजडित मुकुट शोभतो बरा ।। रुणझुणती नूपुरें चरणी गाघरिया ।। जय० ।। २ ।। लंबोदर पितांबर फणिवरबंधना ।। सरळ सोंड वक्रतुंड त्रिनयना ।। दास रामाचा वाट पाहे सदना ।। संकटी पावावें निर्वाणी रक्षावें सुरवरवंदना ।। जय देव जय देव जय मंगलमूर्ती ।। दर्शन० ।।३ ।।

# नाना परिमळ दुर्वा

नाना परिमंडळ दुर्वा शेंदुर शमिपत्रें ।। लाडू मोदक अन्नें परिपूरित पात्रें ।। ऐसें पूजन केल्या बीजाक्षरमंत्रें ।। अष्टहि सिद्धि नवनिधि देसी क्षणमात्रें ।। १ ।। जय देव जय देव जय मंगलमूर्ती ।। तुझे गुण वर्णाया मज कैंची स्फूर्ती ।। जय० ।। ।।धृ० ।। तुझे ध्यान निरंतर जे कोणी करिती ।। त्यांचीं सकलहि पापें विघ्नेंही हरती ।। वाजी वारण शिबिका सेवक सुत युवती ।। सर्वहिपावुनि अंतीं भवसागर तरती ।। जय देव० ।। २ ।। शरणागत सर्वस्वें भजती तव चरणीं ।। कीर्ति तयांची राही जोंवरी शशितरणी ।। त्रैलोक्यीं ते विजयी अद्‌भुत हे करणी ।। गोसावीनंदन रत नामस्मरणीं ।। जय देव जय देव जय० ।। ३ ।।

# त्रिगुणात्मक त्रैमूर्ती

त्रिगुणात्मक त्रैमूर्ती दत्त हा जाणा ।। त्रिगुणी अवतार त्रैलोक्यराणा ।। नेति नेति शब्द न ये अनुमाना ।। सुरवर मुनिजन योगी समाधि न ये ध्याना ।।१।। जय देव जय देव जय श्रीगुरुदत्ता ।। आरती ओवाळींता हरली भवचिंता ।।धृ०।। सबाह्य अभ्यंतरी तूं एक दत्त।। अभाग्यासी कैंची न कळे ही मात ।। पराही परतली तेथे कैंचा हेत।। जन्ममरणाचा पुरलासे अन्त।। जय० ।।२।। दत्त येउनियां उभा ठाकला।। साष्टांगे नमुनी प्रणिपात केला।। प्रसन्न होऊनी आशीर्वाद दिधला।। जन्ममरणाचा फेरा चुकविला ।। जय० ।।३।। दत्त दत्त ऐसे लागले ध्यान।। हरपलें मन झालें उन्मन ।। मीतूंपणाची झाली बोळवण।। एका जनार्दनी श्रीदत्त जाण ।।४।। जय देव जय देव जय०।।

# श्रीज्ञानदेवाची आरती

आरती ज्ञानराजा। महाकैवल्यतेजा।। सेविती साधुसंत।। मनु वेधला माझा ।। आरती० ।।धृ०।। लोपलें ज्ञान जगीं।। हित नेणती कोणी ।। अवतार पांडुरंग।। नाम ठेविले ज्ञानी।। आ०।। कनकाचें ताट करीं।। उभ्या गोपिका नारी ।। नारद तुंबरही ।। साम गायन करी ।। आ०।।२।। प्रकट गुह्य बोले ।। विश्व ब्रह्मचि केलें ।। रामा जनार्दनीं ।। पायीं टकचि ठेलें ।।३।। आरती ज्ञानराजा ।। महाकैवल्य० ।।

# श्री एकनाथाची आरती

आरती एकनाथा ।। महाराजा समर्था।। त्रिभुवनीं तूंचि थोर।। जगद्गुरू जगन्नाथा ।।धृ०।। एकनाथ हें सार ।। वेद शास्त्रांचे गूज ।। संसारदुःख नासे।। महामंत्रांचे बीज ।। आरती ० ।।१।। एकनाथ नाम घेतां ।। सुख वाटलें चित्ता ।। अनंत गोपाळदास ।। धणी न पुरे गातां ।। आरती०।।२।।

# श्रीरामदासाची आरती

आरती रामदासा ।। भक्तविरक्त ईशा। उगवला ज्ञानसूर्य उजळोनी प्रकाश ।।धृ०।। साक्षात् शंकराचा ।। अवतार मारुती ।। कलिमाजी तेचि जाली।। रामदासाची मूर्ती ।।१।। वीसही दशकांचा ।। दासबोध ग्रंथ केला। जडजीवां उद्धरीलें ।। नृप शिवासी तारिलें ।।२।। ब्रह्मचर्य व्रत ज्याचे ।। रामरूप सृष्टि पाहे ।। कल्याण तिही लोकीं ।। समर्थ सद्‌गुरुपाय ।।३।। आरती रामदासा०।।

# श्रीतुकारामाची आरती

आरती तुकारामा ।। स्वामी सद्‌गुरुधामा ।। सच्चिदानंदमूर्ती।। पाय दाखवीं आम्हां ।।धृ०।। राघवें सागरांत ।। पाषाण तारीले ।। तैसे हे तुकोबाचे ।। अभंग उदकी रक्षिले ।। आरती ०।।१।। तुकीतां तुलनेसी ।। ब्रह्म तुकासी आलें ।। म्हणोनी रामेंश्वरें।। चरणी मस्तक ठेविलें ।।आरती०।।२।।

# घालीन लोटांगण

घालीन लोटांगण वंदीन चरण ।। डोळ्यांनि पाहिन रूप तुझे।। प्रेमें आलिंगन आनंदे पूजिन ।। भावें ओंवाळिन म्हणे नामा ।।१।। त्वमेव माता च पिता त्वमेव, त्वमेव बंधुत्व सखा त्वमेव ।। त्वमेव विद्या द्रविणं त्वमेव, त्वमेव सर्वं मम देव देव ।। २।। कायेन वाचा मनसेंद्रियैर्वा, बुद्ध्यात्मना वा प्रकृतिस्वभावात् करोमि यद्यत् सकलं परस्मै, नारायणायेति

समर्पयामि ।।३।। अच्युतं केशवं रामनारायणं कृष्णदामोदर वासुदेव हरिम् ।। श्रीधरं माधवं गोपिकावल्लभं जानकीनायकं रामचंद्रं भजे ।।४।। हरे राम हरे राम राम राम हरे हरे ।। हरे कृष्ण हरे कृष्ण कृष्ण कृष्ण हरे हरे।।५।।